जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार

सुधारित जाहिरात

भारत सरकार UNDP पुरस्कृत आपत्ती धोके व्यवस्थापन कार्यक्रम जुन-2009 अखेर संपुष्टात आला. या कार्यक्रमाची सफलता व सत्कारात्मक फलनिष्पती लक्षात घेऊन महाराष्ट्र आपत्ती धोके व्यवस्थापन कार्यक्रम या नावाचा तत्सम कार्यक्रम राज्यातील सर्व जिल्हयात राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्य,जिल्हा,तालुका व गाव पातळीवरील आराखडे निर्मीती,विविध अधिका-यांचे प्रशिक्षण व उद्बोधन तसेच वेगवेगळया स्तरावर जनजागृती करणे ही सदर कार्यक्रमाची प्रमुख उद्दिष्टे आहेत.

महाराष्ट्र आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नंदुरबार जिल्हा पातळीवर 1 पद पुर्णपणे तात्तपुरते स्वरुपात **एक वर्ष कालावधीसाठी** निर्माण करण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने नंदुरबार जिल्हयाकरीता जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी (District Disaster Management Officer)1 पद एक वर्ष कालावधीसाठी भरावयाचे असल्याने पात्र उमेदवारांकडुन दि. 19.6.2010 पावेतो अर्ज मागविणेत येत आहे. दि. 19.6.2010 नंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

| पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|
| जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी (District Disaster Management Officer) | पदवी/पदव्युत्तर पदवी (सामाजिक शास्त्रे किंवा आपत्ती व्यवस्थापन) | 1) आपत्ती व्यवस्थापनातील कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल<br>2)मराठी व इंग्रजी भाषाचे चांगले ज्ञान असणे इष्ट<br>3) टिपणी लेखन,अहवाल लेखन यामध्ये विशेष प्राविण्य |

वरील बाबींची पुर्तता करणा-या व प्रकल्प हाताळण्याचा पुर्वानुभव असणा-या उमेदवारांचा सदर पदासाठी प्राधान्याने विचार करण्यात येईल

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी पदासाठी ठोक वेतन- र.रु.-22,000/- प्रति महिना राहिल.

**सुचना**

1) अर्ज टंकलिखीत अथवा संगणीकृत असावा. अपुर्ण माहिती असलेले अर्ज रद्द ठरविले जातील व याबाबत फेरविचार केला जाणार नाही,म्हणुन उमेदवाराने अर्ज सादर करतांना योग्य ती दक्षता घ्यावी.
2) अर्जामध्ये उमेदवाराचे संपुर्ण नाव,पत्रव्यवहाराचा पत्ता, जन्मतारीख,वय, जात/पोटजात व जातीचा प्रवर्ग, शैक्षणिक अर्हता बाबत संपुर्ण तपशिल, कामाचा अनुभवाबाबत तपशिल इ.माहिती नमुद करुन प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात. कृपया मुळ प्रमाणपत्राची प्रती अर्जासोबत जोडु नये.
3) उमेदवारांनी आपले अर्ज समक्ष किंवा पोस्टाव्दारे म.जिल्हाधिकारी नंदुरबार, जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार ता.जि.नंदुरबार या पत्त्यावर दि.19.6.2010 रोजी सायंकाळी 5-45 वाजे पावेतो पोहचतील अशा बेताने पाठवावेत. तद्नंतर पोस्टाव्दारे वा अन्य प्रकारे प्राप्त होणा-या अर्जाची अथवा त्यासंबंधी कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही, तसेच उमेदवारांचे अर्ज शासकिय सुट्टयांचे दिवशी स्विकारले जाणार नाहीत.
4) अर्जासोबत 22 से.मी./12 से.मी. आकाराचा स्वत:चे नाव व पत्त्यासह पोस्टाचे रु.5/- चे तिकीट लावलेला लिफाफा व पासपोर्ट आकाराचा अलीकडे काढलेला जास्तीचा फोटो जोडावा

स्वाक्षरीत/-

जिल्हाधिकारी नंदुरबार